# MPSC

# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)




Headlines: १७ डिसेंबर ते २२ डिसेंबर २०१९

२३ डिसेंबर २०१९

# हेडलाईन्स

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा महाभियोग

- 18 डिसेंबर 2019 रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकन कॉंग्रेसच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हने पदच्युत केले आहे.
- डोनाल्ड ट्रम्प हे बिल क्लिंटन आणि अॅण्ड्र्यू जॉन्सन यांच्यानंतर महाभियोग प्रक्रियेद्वारे पदच्युत होणारे हे तिसरे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असतील.

**अमेरिकन संसद (कॉंग्रेस) :**

- अमेरिकन संसदेत एकूण दोन सभागृह आहेत. एका सभागृहास हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह तर दुसऱ्या सभागृहास सिनेट असे म्हणतात.
- हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये 435 तर सिनेटमध्ये एकूण 100 सदस्य आहेत जे अमेरिकेच्या एकूण पन्नास राज्यांचे प्रतिनिधित्व करतात.

**अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचा महाभियोग :**

- अमेरिकन राष्ट्राध्यक्ष यांच्या महाभियोगाची प्रक्रियेची सुरुवात ही हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह द्वारा केली जाते तर याची चौकशी आणि शेवटचा निर्णय हा सिनेट घेते. यासाठी सिनेटमध्ये दोन तृतीयांश बहुमत लागते.
- हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांना पदच्युत करण्यात यावे हे असे मतदान करण्यात आले आहे कारण त्या सभागृहांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाचे सदस्य हे बहुमताने आहेत परंतु सिनेटमध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे सदस्य बहुमताने असल्याकारणाने त्यांना राष्ट्राध्यक्ष पदावरून दूर करणे अवघड ठरणार आहे
- बिल क्लिंटन आणि अॅण्ड्र्यू जॉन्सन यांच्या वेळेस देखील रिप्रेझेंटेटिव्ह यांनी त्यांना पदच्युत करण्याचा निर्णय दिला होता परंतु सिनेटमध्ये त्यांच्या पक्षाचे बहुमत असल्याकारणाने त्यांना पदावरून दूर करण्यात आले नाही.

**भारतीय राष्ट्रपतींचा महाभियोग :**

- भारतीय राज्यघटनेच्या कलम 61 नुसार ही प्रक्रिया आहे.
- राज्य घटनेचा भंग झाल्यावर हा प्रस्ताव मांडण्यात येतो.
- कोणत्याही गृहामध्ये हा प्रस्ताव मांडता येतो.
- 14 दिवसांच्या पूर्व सूचनेची आवश्यकता (राष्ट्रपतींना)
- हा ठराव संमत होण्यासाठी त्या सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या दोन तृतीयांश मतदानाची म्हणजेच विशेष बहुमताची आवश्यकता असते.
- महाभियोगाच्या खटल्यात लोकसभा व राज्यसभेतील सर्व सदस्य (नियुक्त व नामनिर्देशित) मतदान करू शकतात.
- ही अर्धन्यायिक प्रक्रिया आहे.

## जगातील सर्वात तरुण पंतप्रधान सना मरीन

- 34 वर्षांच्या सना मरीन या जगातील सर्वात तरुण पंतप्रधान ठरल्या आहेत.
- 10 डिसेंबर 2019 रोजी त्यांनी फिनलंड देशाच्या पंतप्रधान पदाची शपथ घेतली.
- यांचा जन्म हेलसिंकी येथे झालेला आहे.
- त्यांनी वयाच्या 27 व्या वर्षी राजकारणात प्रवेश केला.
- त्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या असून आधी वाहतूक आणि संपर्क मंत्री होत्या.

## जेंडर गॅप रिपोर्ट 2019 जाहीर, भारत 112 व्या क्रमांकावर

- जागतिक आर्थिक मंच (WEF) या संस्थेनी 'जेंडर गॅप रिपोर्ट' प्रकाशित केला आहे. महिलांचे आरोग्य व अस्तित्व आणि आर्थिक सहभागाच्या संदर्भातली स्त्री-पुरुष असमानता याबाबतीत जगभरातल्या देशांचे मूल्यांकन करून त्यासंबंधी हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

**अहवालातल्या ठळक बाबी :**

- स्त्री-पुरुष असमानतेच्या बाबतीत यादीत भारत 112व्या क्रमांकावर आहे. यावेळी असमानतेच्या बाबतीत भारताची चार स्थानांनी घसरण झाली आहे. दोन घटकांच्या बाबतीत भारत आता तळाशी पाचव्या स्थानी आहे.

**विविध क्षेत्रातील भारताचा क्रमांक :**

1. राजकीय क्षेत्र - 18
2. आरोग्य आणि अस्तित्व - 150
3. आर्थिक सहभाग आणि संधी - 149
4. शैक्षणिक प्राप्ती - 112

- आइसलँड हा स्त्री-पुरुष समानता राखण्याच्या बाबतीत जगातला सर्वात तटस्थ देश आहे.
- यादीत पहिल्या दहामध्ये अनुक्रमे आइसलँड, नॉर्वे, फिनलँड, स्वीडन, निकाराग्वा, न्यूझीलंड, आयर्लंड, स्पेन, रवांडा आणि जर्मनी हे देश आहेत.
- येमेन (153 वा) हा स्त्री-पुरुष असमानतेच्या बाबतीत सर्वात वाईट देश (तळाशी) आहे. त्यापूर्वी इराक (152वा) आणि पाकिस्तान (151 वा) हे देश आहेत.
- जागतिक पातळीवर, स्त्रियांकडे संसदेतल्या कनिष्ठ गृहाच्या 25.2 टक्के जागा आणि मंत्रिपदाच्या 21.2 टक्के जागा आहेत.
- आर्थिक संधीची दरी आणखीनच खालावली असून ती गेल्या वर्षीच्या 202 वर्षांच्या तुलनेत यावर्षी 257 वर्षे झाली आहे.
- भारत (35.4 टक्के), पाकिस्तान (32.7 टक्के), येमेन (27.3 टक्के), सीरिया (24.9 टक्के) आणि इराक (22.7 टक्के) या देशांमध्ये महिलांसाठी आर्थिक संधी अत्यंत मर्यादित आहेत.
- कंपनीच्या संचालक मंडळावर महिलांचे प्रतिनिधित्व कमी असलेल्या देशांमध्ये भारत (13.8 टक्के) देखील आहे, तर चीनमध्ये (9.7 टक्के) त्याहूनही वाईट स्थिती आहे.

## बोगेनविले : जगातला नवा देश बनण्याच्या मार्गावर

---

- पापुआ न्यू गिनीपासून स्वातंत्र्य मिळवून जगातला सर्वात नवीन देश होण्याची घोषणा 11 डिसेंबर 2019 रोजी बोगेनविले या प्रदेशाच्या दक्षिण प्रशांत क्षेत्राच्या बोगेनविले सार्वमत आयोगाकडून करण्यात आली. बोगेनविले सार्वमत आयोगाचे अध्यक्ष बर्टी अहेरन यांनी ही घोषणा केली आहे.
- आता स्वातंत्र्यासाठी बोगेनविले आणि पापुआ न्यू गिनी यांच्या नेत्यांदरम्यान वाटाघाटी होणे आवश्यक आहे. त्यानंतर पापुआ न्यू गिनीच्या संसदेत अंतिम निर्णय घेतला जाणार. अद्याप संयुक्त राष्ट्रसंघाकडून या निर्णयाला मान्यता मिळालेली नाही.
- बोगेनविले प्रदेशातल्या लोकांनी अलीकडेच पापुआ न्यू गिनीपासून वेगळे होण्याविषयी मतदान केलेले आहे. सुमारे 85 टक्के पात्र मतदारांनी दोन आठवड्यांच्या मतदानात 181,000 हून अधिक मत दिले.

**पार्श्वभूमी**

- 2001 सालाच्या शांतता कराराचा हा एक मुख्य भाग आहे. या करारामुळे गृहयुद्ध संपुष्टात आणले गेले, ज्यामध्ये पापुआ न्यू गिनी मुख्य भूमीच्या पूर्वेकडे असलेल्या बेटांवरील कमीतकमी 15 हजार लोकांचा मृत्यू झाला.
- बोगेनविले हा प्रदेश तांबे धातूच्या प्रचंड साठ्यासाठी प्रसिद्ध आहे. 1980 सालच्या उत्तरार्धात पांगुना येथे असलेल्या खाणीवरून संघर्षास सुरुवात झाली. ही खाण पापुआ न्यू गिनीसाठी महत्त्वाची होती. परंतु तेथील खाणकामामुळे लोकांच्या पारंपरिक राहणीमानावर प्रतिकूल परिणाम झाल्याचा त्यांनी राग व्यक्त केला.

**बोगेनविलेविषयी :**

- बोगेनविले हा सोलोमन द्वीपसमूहाचा (आर्किपॅलागो) एक सर्वात मोठा द्वीप/बेट आहे. या बेटावर प्रचंड प्रमाणात तांबे धातूचे साठे आहेत.
- या प्रदेशात सर्वाधिक प्रमाणात बोलली जाणारी भाषा हलिया ही आहे.
- पापुआ न्यू गिनीच्या बोगेनविले या स्वायत्त प्रदेशाचे मुख्य बेट बागेनविले बेट आहे. या प्रदेशास बोगेनविले प्रांत किंवा उत्तर सोलमन म्हणूनही ओळखले जाते.
- त्याचे भूक्षेत्र 9,318 चौरस किलोमीटर एवढे आहे. या प्रांताची लोकसंख्या जवळपास 2,34,280 इतकी आहे.

## प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्याचे उद्‌घाटन

---

- 18 डिसेंबर 2019 रोजी नवी दिल्लीत केंद्रीय नरेंद्र सिंग तोमार (ग्रामीण विकास, कृषी व शेतकरी कल्याण आणि पंचायती)यांच्या हस्ते नवी दिल्लीत तिसऱ्या टप्प्याचे उद्‌घाटन झाले.

**PMGSY-III चे स्वरूप :**

- मुख्य ग्रामीण मार्गांना जोडणारा 1,25,000 कि.मी. लांबीचा रस्ता तयार करणे.
- त्याद्वारे ग्रामीण वसाहतींना ग्रामीण कृषी बाजारपेठा, उच्च माध्यमिक शाळा व रुग्णालये यांना जोडणे, हे यावेळचे उद्दिष्ट आहे.
- बांधकामासाठी वर्ष 2019 ते 2025 असे असेल.
- **वित्तपुरवठ्याचे प्रमाण :** 60:40 (केंद्र-राज्य) तर ईशान्येकडील व हिमालयातल्या राज्यांसाठी 90:10 (केंद्र-राज्य)
- ग्रामीण भारतात हरित तंत्रज्ञानाचा वापर करून 36,063 कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे बांधकाम केले. त्यातला एक मोठा भाग प्लॅस्टिकचा कचरा आणि कोल्ड मिक्स तंत्रज्ञानाचा आहे.

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना :**

- स्थापना : 20 डिसेंबर 2000
- उद्दिष्ट : ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय अंतर्गत.
- मुख्य उद्देश : 2001 च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण क्षेत्रात 1000 पेक्षा जास्त व आदिवासी भागातल्या 500 पेक्षा जास्त पात्र लोकवस्तीची न जोडलेली गावे बारमाही रस्त्याद्वारे जोडणे.

## 36 व्या आंतरराष्ट्रीय भू-शास्त्रीय परिषदेचे दिल्लीत आयोजन

- 2 ते 8 मार्च 2020 या कालावधीत दिल्लीत '36व्या आंतरराष्ट्रीय भू-शास्त्रीय परिषद' (International Geological Congress -IGC) या कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे.
- यावर्षी परिषदेचा विषय आहे, 'जिओसायन्सेस: द बेसिक सायन्स फॉर ए सस्टेनेबल डेव्हलपमेंट'.
- ही परिषद 'ऑलिंपिक ऑफ जिओसायन्स' म्हणून लोकप्रिय आहे.
- इंडियन नॅशनल सायन्स ॲकॅडमी (INSA) आणि बांग्लादेश, पाकिस्तान, नेपाळ व श्रीलंका या राष्ट्रीय विज्ञान अकादमींच्या सहकार्याने खाण मंत्रालय आणि भू-शास्त्र मंत्रालय या कार्यक्रमाचे आयोजन करणार आहे.
- या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी भारतीय भूगर्भीय सर्वेक्षण (GSI) संस्था ही नोडल एजन्सी आहे.
- आगामी 'IGC' शाश्वत विकास, ऊर्जा संकट, जलसंकट, हवामान बदल, पर्यावरणविषयक प्रश्न आणि संसाधन व्यवस्थापन यासंबंधी समस्या सोडविण्यासाठी मदत करणार आहेत.

**परिषदेविषयी :**

- आंतरराष्ट्रीय भू-शास्त्रीय संघ (International Union of Geological Sciences -IUGS) ही एक आंतरराष्ट्रीय गैर-सरकारी संघटना आहे, जी भूशास्त्र क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्याने समर्पित आहे.
- संस्थेची स्थापना 1961 मध्ये झाली. सध्या 121 देशांचे आणि प्रांतातले भूगर्भशास्त्रज्ञ आणि संस्था यांचा सहभाग आहे. संघाचे सचिवालय सध्या चीनच्या बीजिंग या शहरातल्या चिनी ॲकॅडमी ऑफ जिओलॉजिकल सायन्सेस येथे आहे.
- आंतरराष्ट्रीय भू-शास्त्रीय संघाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय भू-शास्त्रीय परिषद' (IGC) चार वर्षांतून एकदा आयोजित केली जाते आणि जगभरातले सुमारे 5000-6000 भू-वैज्ञानिक या परिषदेत भाग घेतात.
- खाण क्षेत्रातल्या गुंतवणुकीची संधी, खनिज अन्वेषण व पर्यावरण व्यवस्थापन व संबंधित उद्योगांसह आंतरराष्ट्रीय भू-शास्त्र क्षेत्रातल्या आंतरराष्ट्रीय सहकार्यास एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे अपेक्षित असते.

## साहित्य अकादमी पुरस्कार 2019 जाहीर

- साहित्य अकादमीने 23 भाषांमधल्या साहित्यासाठी 2019 या वर्षासाठी त्यांचे वार्षिक पुरस्कार जाहीर केले आहेत.
- नेपाळी भाषेसाठी यावेळी पुरस्कार जाहीर करण्यात आला नाही.
- पुरस्काराचे वितरण 25 फेब्रुवारी 2020 रोजी दिल्लीत होणार आहे.

**साहित्य अकादमी पुरस्काराविषयी :**

- साहित्य अकादमी पुरस्कार साहित्याच्या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान करणाऱ्या 24 भाषांतील साहित्यिकांना दिला जातो. साहित्यिकांमध्ये मानाचे स्थान असणाऱ्या या पुरस्काराचे वितरण दिल्ली येथे होते. पन्नास हजार रुपये

रोख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

- प्रदानकर्ता–साहित्य अकादमी,भारत सरकार
- प्रथम पुरस्कार–1955
- भाषा– पुढील 24 भारतीय भाषांमधील योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येतो.
- आसामी, इंग्रजी, उर्दू, ओरिया, कन्नड, काश्मिरी, कोंकणी, गुजराती, डोग्री, तमिळ, तेलुगू, नेपाळी, पंजाबी, बंगाली, बोडो, मणिपुरी, मराठी, मल्याळम्, मैथिली, राजस्थानी, संथाळी, संस्कृत, हिंदी.
- 1957 साली हा पुरस्कार देण्यात आला नव्हता.
- **1955 प्रथम पुरस्कार विजेते:** लक्ष्मणशास्त्री जोशी

लेखनाचे नाव : वैदिक संस्कृतीचा विकास, शैली संशोधन.

- **2018 चा पुरस्कार :** म. सु. पाटील

लेखनाचे नाव : सर्जनप्रेरण आणि कवित्वशोध, शैली–समीक्षा.

**2019 काही भाषानिहाय विजेते :**

| | |
|---|---|
| मराठी – अनुराधा पाटील | (‘कदाचित अजूनही’ काव्यसंग्रह) |
| हिंदी – नंदकिशोर आचार्य | (‘छिलते हुए अपने को’ काव्यसंग्रह) |
| इंग्रजी – शशी थरुर | (‘ॲन एरा ऑफ डार्कनेस’ पुस्तक) |
| कोंकणी – नीलबा खांडेकर | (‘द वर्ड्स्’ कवितासंग्रह) |
| संस्कृत – पेन्ना मधुसूदन | (‘प्रज्ञाचक्षुषम्’ कवितासंग्रह) |
| बोडो – फुकनचंद्र बसुमतारी | (‘खाइ आथुमनिफ्राय’ कवितासंग्रह) |

## कवयित्री अनुराधा पाटील यांना यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार

- कवयित्री अनुराधा पाटील यांना 2019 सालाचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे.
- समकालीन मराठी साहित्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील यांना त्यांच्या ‘कदाचित अजूनही’ या काव्यसंग्रहाला पुरस्कार जाहीर झाला आहे.
- मराठीसह 23 भाषांतील साहित्य पुरस्कारांची बुधवारी 18 डिसेंबर रोजी अकादमीचे सचिव डॉ. के. श्रीनिवासन यांनी घोषणा केली. या पुरस्काराचे 25 फेब्रुवारी रोजी वितरण होणार आहे.
- 7 कवितासंग्रह, 6 कथासंग्रह, 3 निबंध, 1 कथेतर गद्य आणि एक आत्मचरित्र आशा 5 साहित्य प्रकारांना 2019 चा साहित्य पुरस्कार देण्यात आला आहे.
- मराठी साहित्यासाठी आसाराम लोमटे, लक्ष्मण माने, वासुदेव सावंत हे तीन परीक्षक होते.

## आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र प्राधिकरण (IFSCA) विधेयक 2019 संसदेत मंजूर

- भारतातल्या आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रांमध्ये (IFSC) होणाऱ्या 2 सर्व आर्थिक क्रियाप्रक्रियांचे नियमन एकाच जागी करण्याच्या उद्देशाने एका प्राधिकरणाची स्थापना करण्याची परवानगी देणारे विधेयक 12 डिसेंबर 2019 ला राज्यसभेत मंजूर केले गेले.
- लोकसभेत 11 डिसेंबर रोजी मान्यता.
- सध्या IFSC संस्थांमधील बँकिंग, भांडवली बाजारपेठ आणि विमा क्षेत्र विविध नियामकांद्वारे नियमित केले जात आहे.
- भारतीय रिझर्व्ह बँक (RBI), भारतीय रोखे व विनिमय मंडळ (SEBI), निवृत्तीवेतन निधी नियंत्रण व विकास प्राधिकरण (PFRDA) आणि भारतीय विमा नियंत्रण व विकास प्राधिकरण (IRDAI) या संस्थांकडून हा कारभार व्यवस्थापित केला जात आहे.

**नव्याने कायद्यांमध्ये केलेल्या दुरुस्त्या :**

- या विधेयकाद्वारे SEBI कायदा, IRDA कायदा आणि PFRDA कायद्यासह एकूण 14 कायद्यांमध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे.

**प्राधिकरणाचे कार्य :**

- आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र प्राधिकरण (International Financial Services Centers Authority –IFSCA) हे भारतातल्या आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रांमध्ये (IFSC) चालणाऱ्या सर्व आर्थिक क्रियाप्रक्रियांमध्ये समन्वय राखणार, त्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करणार.

- हे प्राधिकरण केंद्रसरकारच्या सल्लामसलतीने व्यवहार करेल.
- तसेच यानुसार 'आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र प्राधिकरण निधी'ची स्थापना केली जाईल.
- प्राधिकरणाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी 'परफॉर्मन्स रिव्ह्यू कमिटी'ची स्थापना केली जाईल.

**प्राधिकरणाची रचना :**

- प्राधिकरणात अध्यक्षांसह एकूण नऊ सदस्यांचा समावेश.
- सर्वांची नियुक्ती केंद्र सरकार करणार.
- एक अध्यक्ष व RBI, SEBI, IRDAI व PFRDA यांचे प्रत्येकी एक आणि केंद्रीय अर्थ मंत्रालयाचे दोन अधिकारी याचे सदस्य असणार आहेत.
- उर्वरित दोन सदस्यांची नेमणूक शोध समितीच्या शिफारसीवरून केली जाणार.
- यांची नेमणूक तीन वर्षांसाठी केली जाईल व ते पुनर्नियुक्तीसाठी पात्र असतील.

**महत्वाचे :**

- भारतातले पहिले IFSC केंद्र गुजरात राज्यात गांधीनगर शहरातल्या 'GIFT सिटी' येथे उभारण्यात आले आहे.
- हे केंद्र विशेष आर्थिक क्षेत्र कायदा-2005 अन्वये स्थापन करण्यात आले आहे.

## एप्रिल 2020 पासून टेली- लॉ सेवेस सुरुवात

- 1 एप्रिल 2020 पासून केंद्र सरकार मोफत कायदेशीर सल्ला सुविधा उपलब्ध करणार आहे.
- ही सेवा सामायिक सेवा केंद्रामार्फत (कॉमन सर्व्हिसेस सेंटर- CSC) मार्फत पुरवली जाईल.
- **उद्देश** : ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्यांना तसेच प्रत्यक्षात कायदेशीर सल्ला घेऊ शकत नसलेल्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कायदेशीर सल्ला पुरवणे.
- याद्वारे संबंधित सेवा केंद्रांकडून वकिलांमार्फत कायदेशीर सल्ला प्राप्त करून दिला जाईल.
- सध्या ईशान्य भारत व उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये ही सेवा सुरू करण्यात आलेली आहे.

**महत्त्वाचे** :

- भारतीय राज्यघटनेतील कलम 39 (अ) भाग 4.
- (राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे) यात समान न्याय व मोफत कायदेशीर सहाय्याची तरतूद करण्यात आली आहे.
- हे कलम 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्तीने जोडले गेले.

**राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरण (NALSA )**

- 1987 च्या 'राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरण' कायद्यान्वये 9 नोव्हेंबर 1995 ला स्थापना.
- **मुख्यालय :** दिल्ली.
- **ब्रीदवाक्य :** 'न्याय सबके लिये'
- 1987 च्या या कायद्याअंतर्गत 'लोकअदालत'ला वैधानिक दर्जा प्राप्त झाला.
- **उद्देश** : न्यायपालिकेकडील ओढा कमी करणे व खटल्यांचा त्वरित निकाल लावणे.

## 2020 मध्ये वन नेशन वन फास्टटॅग होणार लागू

- टोलनाक्यांवरील वाहनांची गर्दी टाळण्यासाठी जानेवारी 2020 पासून केंद्र सरकार 'वन नेशन वन फास्टटॅग' योजना लागू करणार आहे.

**नियमावली :**

- फास्टटॅगसाठी वाहन मालकाचे केवायसी, वाहननोंदणी इ. आवश्यक.
- एक लाख रुपयांपर्यंत फास्टटॅग रिचार्ज करता येणार असून बचत खात्याला लिंक करता येईल.
- ऑनलाईन रिचार्ज करण्याची सुविधा.

## टोनी सिंग मिस वर्ल्ड 2019

- जमैकाच्या टोनी सिंह हिने 2019 चा मिस वर्ल्ड किताब जिंकला.
- द्वितीय क्रमांक - ओफेली मेझीनो (फ्रान्स)
- तृतीय क्रमांक - सुमन राव (भारत)
- स्पर्धेचे ठिकाण - लंडन (ब्रिटन)

**टोनी सिंग विषयी :**

- टोनी सिंग भारतीय वंशाची आहे.
- असा पुरस्कार मिळवणारी ती जमैकातर्फे चौथी विजेती ठरली आहे.

**मिस वर्ल्ड स्पर्धेविषयी :**

- मिस वर्ल्ड ही सर्वात जुनी आंतरराष्ट्रीय सौंदर्यस्पर्धा आहे.
- मुख्यालय - लंडन
- 'मिस युनिव्हर्स' व 'मिस अर्थ' या प्रमुख जागतिक सौंदर्य

स्पर्धांपैकी एक स्पर्धा.

- स्पर्धेचे आयोजन लंडनमधील 'मिस वर्ल्ड ऑर्गनायझेशन' या संस्थेतर्फे होते.
- संस्थेची स्थापना –1951 मध्ये एरिक मोर्ले यांनी केली.
- स्पर्धेचे घोषवाक्य – 'ब्युटी विथ ए पर्पज.
- सर्वप्रथम विजेती – किकी हँकनसन (स्वीडन) 1951.

**आतापर्यंतच्या 6 भारतीय विजेत्या महिला :**

1. 1966 – रिटा फारिया
2. 1994 – ऐश्वर्या राय
3. 1997 – डायना हेडन
4. 1999 – युक्ता मुखी
5. 2000 – प्रियंका चोप्रा
6. 2017 – मानुशी छिल्लर

## राष्ट्रीय अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत राही सरनोबतला सुवर्णपदक

- आशियायी क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या राही सरनोबतने 63व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत महिलांच्या 25 मीटर स्पोर्ट्स् पिस्तुल प्रकारात सुवर्णपदक पटकावले.
- कनिष्ठ गटातील सुवर्णपदक विजेत्या मनु भाकरेला वरिष्ठ गटात रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.
- महिलांच्या वरिष्ठ गटात राही हिने एकूण 589 गुण मिळवले, तर अंतिम फेरीत 41 गुण मिळवले. मनूला प्राथमिक फेरीत 582 आणि अंतिम फेरीत 32 गुण मिळाले.
- या गटातील कांस्यपदक महाराष्ट्राच्या अभिज्ञा पाटीलला मिळाले. प्राथमिक फेरीत तिला 575 तर अंतिम फेरीत 27 गुण मिळाले.
- महाराष्ट्राला 1738 गुणांसह सांघिक सुवर्णपदक व हरियाणाला दुसरे स्थान मिळाले.

## डॉ. श्रीराम लागू यांचे निधन

- नटसम्राट नाटकाचे नायक व मराठी रंगभूमीचे खरेखुरे नटसम्राट डॉ. श्रीराम लागू 17 डिसेंबर रोजी काळाच्या पडद्याआड गेले.
- 1951 पासून सुरू झालेल्या नाट्य व चित्रपट कारकीर्दीमध्ये लागू यांना अनेक सन्मान मिळाले.
- मराठी चित्रपटांसाठी त्यांना 'सुगंधी कट्टा', 'भिंगरी', 'सामना'या चित्रपटांतील अभिनयासाठी 'फिल्मफेअर' पारितोषिकांनी गौरवले होते. 'घरोंदा' या हिंदी चित्रपटासाठी त्यांना सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला होता.
- 'इथे ओशाळला मृत्यू', 'हिमालयाची सावली', 'सूर्य पाहिलेला माणूस' ही काही त्यांची गाजलेली नाटके आहेत.

**श्रीराम लागू यांच्याविषयी :**

- पूर्ण नाव– डॉ. श्रीराम बाळकृष्ण लागू
- जन्म– 16 नोव्हेंबर 1927
- मृत्यू– 17 डिसेंबर 2019
- कारकीर्द कालावधी–1972 पासून

**पुस्तके**

- झाकोळ (डॉ. लागू यांचे निवडक लेख, मुलाखती, भाषणे इत्यादींचा संग्रह)
- लमाण– डॉ.लागू यांचे आत्मचरित्र, 2004 मध्ये प्रकाशित

**पुरस्कार**

- 1974 : पद्मश्री
- 2000 : पुण्यभूषण
- संगीत नाटक अकादमी
- फिल्मफेअर–1978, मुख्य सहायक अभिनेता म्हणून घरोंदा या चित्रपटासाठी.
- कालिदास सन्मान–1997
- महाराष्ट्र शासन जीवनगौरव पुरस्कार–2006
- संगीत नाटक अकादमी फेलोशिप–2010
- राजर्षी शाहू कला गौरव पुरस्कार–2012

# दिनविशेष

## 18 डिसेंबर : आंतरराष्ट्रीय स्थलांतर दिन

- आंतरराष्ट्रीय स्थलांतर दिन दरवर्षी 18 डिसेंबर रोजी साजरा केला जातो.
- 'स्थलांतरितांसाठीच्या आंतरराष्ट्रीय संस्थे'कडून स्थलांतरित आणि त्यांच्या समुदायांचे कौतुक केले जाते.
- जगभरातील स्थलांतरितांसाठी तसेच स्थलांतरित झालेल्या समाजासाठी त्यांच्या समोर असलेली

आव्हाने लक्षात घेता त्यांच्यासाठी संधी निर्माण करून दिली जाते.

- **ध्येय :** प्रत्येक स्थलांतरितास सन्मानाने वागवणे.
- **उद्दिष्ट :** आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांना सामोरे जावे लागणाऱ्या आव्हाने व अडचणींविषयी जागरूकता वाढविणे.

**महत्वाचे :**

1. नवीन जीवन जगणाऱ्या आणि नवीन समुदायांची उभारणी करणाऱ्या परप्रांतीयांच्या विशिष्टतेवर भर.
2. सामाजिक समस्यांच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित.
3. आंतरराष्ट्रीय स्थलांतरण संस्था द्वारा स्थलांतरित आणि समुदायांचे कौतुक.
4. जगभरातील समाजांसाठी आव्हाने आणि संधी निर्माण करणे.

**स्थलांतरित संकल्पना :**

- जी व्यक्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाते, विशेषतः काम शोधण्यासाठी किंवा राहणीमानाच्या चांगल्या परिस्थितीसाठी जाते त्या व्यक्तीला स्थलांतरित असे म्हणतात.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

- करार स्वीकार : संयुक्त राष्ट्र आमसभेने 18 डिसेंबर 1990 रोजी करार स्वीकारला
- स्थलांतरित कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य संरक्षण यावर आधारित करार.

**घोषणा :**

- 4 डिसेंबर 2000 रोजी आमसभेची स्थलांतरितांच्या वाढत्या संख्येस मान्यता देऊन 18 डिसेंबरला हा दिवस आंतरराष्ट्रीय स्थलांतर दिवस म्हणून घोषित केला

## 20 डिसेंबर : आंतरराष्ट्रीय मानव एकात्मता दिवस

- दरवर्षी 20 डिसेंबर या दिवशी जगभरातल्या देशांमध्ये आंतरराष्ट्रीय मानव एकात्मता दिवस साजरा केला जातो.
- आंतरराष्ट्रीय मानव एकात्मता दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांच्या विविधतेमधील एकात्मतेचे महत्त्व स्पष्ट करत जागरूकता पसरवणे हा आहे. 'हेल्प फॉर ह्यूमेन रिसर्च अँड डेव्हलपमेंट' या संस्थेनी भारतीयांना एकात्मतेच्या सूत्रात बांधण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे.

**पार्श्वभूमी :**

- संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेनी मानव एकात्मतेच्या संदर्भात निर्णय घेत दरवर्षी 20 डिसेंबरला 'आंतरराष्ट्रीय मानव एकात्मता दिवस' पाळण्याचा निर्णय घेतला.
- 2030 शाश्वत विकास ध्येय (SDG) पूर्णपणे नागरिक आणि ग्रह या घटकांवर केंद्रित आहेत, ज्यात मानवाधिकारांना पाठबळ दिले जात आहे आणि दारिद्र्य, उपासमार आणि रोगराई या समस्यांमधून लोकांना बाहेर काढण्यासाठीच्या निर्धारासाठी वैश्विक भागीदारीने ते समर्थित आहे. त्यादृष्टीने जागतिक सहकार्य आणि एकात्मतेची पायाभरणी केली जात आहे. जगभरात 'आंतरराष्ट्रीय मानव एकात्मता दिवस' साजरा करतात.